# ECHO OF HIS CALL

## बोलाविण्याचा प्रतिध्वनी

MARATHI

ECHO OF HIS CALL 1969-2019 GOLDEN JUBILEE
REACHING NATIONS

India's National Spiritual Newspaper

₹ 10/-

Published monthly in ENGLISH, TAMIL, MALAYALAM, TELUGU, HINDI, KANNADA, MARATHI, BENGALI, GUJARATI, ODIYA, ASSAMESE, PUNJABI, NEPALI, URDU, SINHALA & AFRIKAN

Editor : S. SAM SELVA RAJ | 16 Languages | Associate Editor : Rev. SHAUL BENJAMIN SHINDE

VOL: XXVII  YEAR OF OUR LORD JESUS CHRIST, 2025 MARCH  No. 02


### पवित्र शास्त्र

कृपया हा शास्त्र भाग पाठ करा

स्तोत्र : १९:१-९

१. आकाशे देवाचा महिमा वर्णितात; आणि अंतराळ त्याच्या हाताचे कृत्य दाखविते.

२. दिवस दिवसाशी बोलतो, व रात्र रात्रीला ज्ञान कळवते.

३. बोलणे नाही, शब्दही नाहीत, त्यांची वाणी ऐकू येत नाही.

४. त्यांचे मापनसूत्र सर्व पृथ्वीवर ताणले गेले आहे, आणि त्यांचे शब्द पृथ्वीच्या सीमांपर्यंत गेले आहेत. त्यांमध्ये त्याने सूर्यासाठी मंडप उभारला आहे;

५. तो आपल्या मांडवातून निघून येणाऱ्या वरासारखा आहे, आणि तो बलवान मनुष्याप्रमाणे आपली धाव धावण्यास आनंद करतो.

६. त्याचे निघणे आकाशांच्या सीमेपासून व त्याची फेरी त्यांच्या शेवटापर्यंत आहे, आणि त्याच्या उष्णतेपासून काही गुप्त राहत नाही.

७. यहोवाचे नियमशास्त्र पूर्ण आहे; ते जीवाची सुधारणा करणारे आहे; यहोवाची साक्ष खरी आहे, ती अज्ञान्यांस ज्ञानी करणारी आहे.

८. यहोवाचे निर्बंध सरळ आहेत, ते हृदयाला आनंदवितात; यहोवाची आज्ञा शुद्ध आहे, ती डोळे प्रकाशविणारी आहे.

९. यहोवाचे भय निर्मळ आहे, ते सर्वकाळ टिकणारे आहे; यहोवाचे निर्णय सत्य आहेत, ते सर्वस्वी न्यायी आहेत.

# इशायाचा बुडखा

STUMP OF JESSE!



*सन्माननीय प्रमुख संपादक, रेव्ह. अॅन्जेलाइन सेल्वाकुमारी*



आपला प्रभु आणि तारणहार येशू ख्रिस्त याच्या एकमेव नावामध्ये एको ऑफ हिज कॉलच्या विस्तारित कुटुंबाला माझे अभिवादन!

मी यशया ११ वा अध्याय वाचत होते, जो येशू ख्रिस्ताच्या सेवेबद्दल केलेल्या भविष्यवाणीसाठी परिचित आहे. तथापि, मी पहिल्या वाचनाकडे विशेषतः आकर्षित झाले: "**आणि इशायाच्या बुडख्यापासून कोंब निघेल, आणि त्याच्या मुळातून फुटलेली फांदी फळ देईल**" (यशया ११:१).

## बुडखा!

बुडखा या शब्दाने माझे लक्ष वेधून घेतले. बुडखा नक्की काय आहे? एक बुडखा, जो एका छोट्याश्या आणि एकेकाळी फोफावणाऱ्या अस्तित्वाचा अचानक अंत होणाऱ्या जीवनाला दर्शवतो. हे नकाराचे प्रतीक आहे, जे एकेकाळी भरभराटीला आलेल्याचे उरलेले अवशेष आहे; भरभराट थांबल्यानंतर काय उरतं. हे एक अंतिम चित्र आहे: निर्जीव, शेष राहिलेले आणि भविष्य नसलेले. एक बुडखा पूर्वी कसा होता, त्याचा शेवट सूचित करतो, म्हणजेच तो कुजला आणि कालांतराने नाहीसा झाला.

(...पान ३ वर)




एको ऑफ हिज कॉल

यू ट्युब ख्रिश्चन चॅनल !

पास्टर सॅम सेल्वा राज यांच्या सोबत प्रार्थनेत
सहभागी होण्याची संधी
पाच मिनिटांचा संदेश

इंग्रजी, हिन्दी, तमिळ आणि तेलगु

प्रतिदिनी - पहाटे २.०० वाजल्या पासून
रविवारची तमिळ भक्ति - ८.३० सकाळी

* कृपा करुन सबक्राईब करा *

# ECHO OF HIS CALL - (1969-2019 GOLDEN JUBILEE YEAR)

REACHING NATIONS



## तुमच्या अतिप्रिय बंधु कडून...



### आमचे कार्याविषयीचे धोरण

आम्ही समकालीन पीढीला पुरातन आणि आरंभीच्या प्रेषितांची शिकवण तीची प्रखरता कमी न करता स्पष्ट करावी आणि शिकवावी ही काळाची गरज आहे.

HON. EDITOR-IN-CHIEF
Rev. Angeline S. Kumari, M.A., M.Sc., M.Ed.
HON. MANAGING EDITOR
Pastor Alex Samson Sam, B.Th., M.Div.
GENERAL MANAGER
Bro. N. Prakasam, M.A., M.Sc.(C&P), PGDHRM, MBA.
ADMINISTRATION
Sis. Jesy Veena Sam
Adv. K. Puratchivendan, M.Com., C.A., B.L.
Dr. P.E.R. Premchand, M.Sc., M.A., M.Ed., Ph.D.
Dr. C.G.S. Baburao, B.Tech., M.Tech. (DM), Ph.D.
Dr. Rabinder Boaz, M.S. (CMC)
EDITORIAL BOARD
Dr. Serena Bevin, M.A., M.Phil., B.Ed.
Sis. Sajini Cherian
Rev. Dr. K.R. Rajasekaran
Rev. Dr. William Robert, Ph.D., DD, D.Lit.
EDITOR, PUBLISHER & PRINTER
Pastor S. SAM SELVA RAJ
Echo of His Call Printers
10, Mohammed Abdullah 2nd Street,
Chepauk, Chennai- 600 005, India.
Phone : (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766
Cell : (+91) 98410 71852, 98412 71858 95661 31858
E.MAIL
sam@echoofhiscall.org
biblecor@yahoo.co.in
WEBSITES
www.echoofhiscall.org
www.stpaulsmatriculation.com
YOUTUBE CHANNEL
Echo of His Call

**''यहोवा आमचा देव याला तुम्ही उंचावा, आणि त्याच्या पादासनाजवळ नमन करा; तो पवित्र आहे.'' - स्तोत्र ९९:५**

ख्रिस्तातील माझे प्रियजन,

या वर्षाच्या पहिल्या दोन महिन्यांत प्रभूने कृपेने आम्हाला मार्गदर्शन केले आहे. आम्ही त्याला सर्व गौरव, सन्मान आणि स्तुती देतो. मुख्य चर्च आणि त्याच्या कार्यालयातील आमच्या सेवेच्या प्रत्येक क्षेत्रावर देवाने दिलेल्या विपुल आशीर्वादांसाठी आम्ही त्याचे आभार मानतो.

संतोषपुरम, चेपॉक आणि वेलाचेरी येथील आमच्या तमिळ **नहेम्या बायबल कॉलेजेस,** तसेच हिंदी भाषीय **नहेम्या बायबल कॉलेजसाठी** तुम्ही प्रार्थना करावी अशी आम्ही नम्रपणे तुम्हाला विनंती करतो. आजच्या काळात, सेवेसाठी वचनबद्ध असणारी व्यक्ती शोधणे अधिक आव्हानात्मक झाले आहे. म्हणून, समर्पित विद्यार्थ्यांसाठी तुमच्या प्रार्थनांची नितांत गरज आहे.

आमची मासिक वृत्तपत्रे १६ वेगवेगळ्या भाषांमध्ये प्रकाशित होतात आणि बहुतेक ते विनामूल्य वितरीत केले जातात. मात्र, तरुण पिढीमध्ये छापील साहित्य वाचनाची आवड झपाट्याने कमी होत आहे. तुमच्या नातेवाईकांना आणि मित्रांना **एको ऑफ हिज कॉल** या सेवेचा परिचय देऊन आम्हाला अधिक लोकांपर्यंत पोहोचवण्याच्या कामी मदत करण्यासाठी आम्ही तुम्हाला प्रोत्साहित करतो.

देवाच्या कृपेने, आम्ही इंग्रजी, हिंदी, तमिळ आणि तेलुगुमध्ये दररोज यूट्यूबवर **एको ऑफ हिज कॉल**चे भक्तिपर कार्यक्रम प्रसारित करीत आहोत. याशिवाय, आमच्या रविवारच्या उपासना सेवा **एको ऑफ हिज कॉल**च्या यूट्यूब चॅनेलवर थेट प्रक्षेपित केल्या जातात. तुम्ही सुद्धा यामध्ये सहभागी होऊन आशीर्वादित व्हावे यासाठी आम्ही आपल्या सर्वांस आमंत्रित करतो.

कृपया आमची **ग्लोबल व्हिजन फॉर युथ अँड कीड केअर** (GVYKC) या मिनिस्ट्रीची सुद्धा तुमच्या प्रार्थनेत आठवण असू द्या. तुम्ही सुद्धा या सेवेमध्ये विनामूल्य सहभागी होऊ शकता. जगभरातील तरुण आणि लहान मुलांसाठी दररोज रात्री १०.०० वाजता तुमच्या संबंधित स्थानावरून प्रार्थना करण्यास कटिबद्ध व्हा. तुमच्या मोबाईल फोनवर आठवणीसाठी रिंगटोन ठेवा व प्रार्थना करा : '

*'हे प्रभु, जगातील सर्व तरुण मुले, तरुण मुली आणि लहान मुले यांचे स्मरण ठेव''.*

दोन वर्षांपूर्वी ही सेवा सुरु झाली तेव्हापासून पुष्कळ जण या सेवेबरोबर जोडले गेले आणि देवाने त्यांना विपुलतेने आशीर्वादित केले. जर तुम्हीया या सेवेशी जोडण्यास इच्छुक असाल तर कृपया आम्हाला कळवा.

देवाच्या कृपेने सुरळीतपणे चालू असलेल्या खालील सेवांसाठी तुम्ही प्रार्थना करावी अशी आम्ही विनंती करतो: **सेंट पॉल मॅट्रिक्युलेशन स्कुल,** गॉस्पेल प्रिंटिंग प्रेस, तामिळ, इंग्रजी आणि हिंदी भाषेतील **बायबलकोर** (बायबल कॉरस्पॉन्डन्स कोर्स ).

तुमच्या उत्कट प्रार्थना आणि आर्थिक पाठिंब्याबद्दल आम्ही तुमचे मनापासून आभारी आहोत. देव, त्याच्या दयेने, तुम्हाला भरपूर आशीर्वाद देवो!

ख्रिस्त येशूमध्ये तुमचा सेवक,

My son, Pastor Alex Samson Sam, entered the Kingdom of the Lord on February 13th, 2025.

ख्रिस्त येशूमध्ये तुमचे दास

अॅलेक्स सॅ मसन सॅम
पास्टर एस्. सॅम सेल्व राज

(+91) 98412 71858 / 98410 71858, E.mail : sam@echoofhiscall.org

**Our Ministries:** ECHO OF HIS CALL Monthly Magazines (16 languages) ◘ BIBLECOR - Postal Courses (3 languages) ◘ YouTube Ministry ◘ Online Courses ◘ Theological Correspondence Courses (2 languages) ◘ Church Planting ◘ Nehemiah Bible Colleges ◘ Gospel Printing Press ◘ Great Commission Partners ◘ St. Paul's Matriculation School ◘ Crusades ◘ Community Development

## कृपया इथे लक्ष द्या!

आमचे **एको ऑफ हिज कॉल** यूट्युब चॅनलवर आमचे ५ मिनिटांचे मननपर संदेश दररोज पहाटे २.०० वाजता तामिळ, तेलगू, इंग्रजी आणि हिन्दी या भाषांमध्ये प्रसारीत होत असतात. ते संदेश ऐकून तुम्ही देवाची कृपा प्राप्त करु शकता.

आणखी माझे मोबाईल क्रमांक ९८४१०७१८५८, आणि ९८४१२७१८५८ (वैयक्तिक) तुमच्या मोबाईलमध्ये जतन करुन ठेवा.

**- पास्टर एस्. सॅम सेल्वा राज**

(पान १ वरुन...)

हे वचन दावीदाच्या राजघराण्याच्या वंशाचा संदर्भ देते, ज्याचा शेवटी अवशेष झाला, एका बुडख्याप्रमाणे. अवशेष म्हणजे उरलेले, ज्यांनी परीक्षांचा सामना केला, संकटांचा सामना केला आणि स्थिर राहिले. यशया ११:१ हे वचन आपल्याला देव त्याच्या विश्वासू अवशेषांसाठी काय करू इच्छितो हे सांगते: प्रत्येक वादळात जे येशू ख्रिताला धरून आहेत, आणि त्याच्या आधारे ठाम आहेत.

दावीदाने आणि त्याच्या वंशजांनी सिंहासनावर कायमचे राज्य करणे ही देवाची मूळ योजना होती. तरीही, इतिहास एक वेगळी गोष्ट सांगतो. २ राजे २४ आणि २५ मध्ये, आपण वाचतो की, यहूदाचा शेवटचा राजा सिदकीया (ज्याच्या नावाचा अर्थ देवाची देणगी आहे) याच्यावर नेबुखदनेस्सर आक्रमण करून त्याला बंदिस्त करतो, ज्याद्वारे दावीदाच्या राजघराण्याच्या वंशाचे अधिकार उघडपणे संपुष्टात आल्याचे पाहावयास मिळते. तेव्हापासून सुमारे ६०० वर्षे इस्रायलमध्ये राजा नव्हता.

या शांततेच्या काळामध्ये देवाने दिलेले वचन विसरल्यासारखे वाटले. पण देव अविश्वासू नव्हता; तो त्याच्या नेमलेल्या वेळेची वाट पाहत होता. इस्राएल लोक यहुद्यांचा राजा येण्याची मोठ्या आशेने वाट पाहत होते. आणि मग, वेळेची पूर्तता झाल्यावर, देवाने घोषित केले की, इशायाच्या बुडख्यापासून कोंब निघेल.

## कोंब

एका निर्जीव बुडख्यामधून जीवन कसे बहरून येऊ शकेल? हे अशक्य आहे. परंतु देव अगदी निराशाजनक परिस्थिती देखील जिवंत करू शकतो. इस्राएलचा शेवट काय होता हे दिसून आले; एका पराक्रमी राज्याचा निर्जीव अवशेष म्हणून अस्त झाला. ही अवस्था येशू ख्रिस्ताच्या जन्माद्वारे देवाच्या वचनाच्या पूर्ततेचं कारण ठरली.

मशीहा हा एक पराक्रमी आणि शक्तिशाली राजा आहे, जो आपल्या अत्याचारी लोकांना उलथवून टाकण्यास तयार आहे, अशी कल्पना करणाऱ्या इस्राएली लोकांच्या अपेक्षांच्या उलट, येशू नम्रपणे आला व त्याने एका गव्हाणीत जन्म घेतला. कधीकधी, मानवी अपेक्षांचे उल्लंघन करून देवाच्या अभिवचनांची पूर्तता होते. तरीही, त्याच्या योजना नेहमी परिपूर्ण असतात.

इशायाच्या बुडख्यापासून निघालेला कोंब हा नवीन जीवन, आशा आणि पुनर्स्थापना यांचे प्रतीक आहे.

## कोंबचे प्रतिबिंब!

बुडख्यापासून निघालेल्या प्रतीकात्मक कोंबाविषयी अध्ययन करायचे असेल तर आपण शूट (shoot) जो कोंब या मराठीचा इंग्रजी शब्द आहे, त्याच्या परिवर्णीय काव्यानुसार करावे.

## S→ १. अभिवचनांचा स्रोत!

### 1. SOURCE OF PROMISES!

आपला देव हा अभिवचनांचा देव आहे. तो करार करतो आणि त्याच्या वचनापासून तो कधीही मागे फिरत नाही. जेव्हा आपला पाया त्याच्या अभिवचनांवर बांधला जातो, तेव्हा आपण विजयी वीरांपेक्षाही श्रेष्ठ असतो, कारण त्याची वचने येशू ख्रिस्तामध्ये होय आणि आमेन आहेत. देव त्याची वचने कधीही विसरत नाही. तो त्याची वचने पूर्ण करतो, अगदी अनपेक्षित वेळीसुद्धा, कारण तो अभिवचन पूर्ण करण्यास विश्वासयोग्य आहे.

त्याने दावीदाला दिलेले अभिवचन राखले: **तुझ्यापुढे तुझे घर व तुझे राज्य सर्वकाल स्थापित केले जाईल; तुझे राजासन सर्वकाल स्थापित होईल.** (२ शमुवेल ७:१६).

दावीदाच्या राजघराण्याच्या वंशातून कोणीही राजा नव्हता हे पाहता जणू काही काळासाठी देव त्याचे अभिवचन विसरला असे दिसून आले. तथापि, एका अनपेक्षित क्षणी देवाचे वचन पूर्ण करीत बुडख्यातून एक कोंब बाहेर आला.


**Statement about ownership and other particulars about the Newspaper Echo of His Call (Marathi) - Form IV (See Rule 8)**

| | |
|---|---|
| 1. Place of Publication | : **New No. 8 & 10, Old No. 18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai - 600 005.** |
| 2. Periodicity | : **Monthly** |
| 3. Printer, Editor, Owner & Publisher | : **S. Sam Selva Raj** (Same Address) |
| 4. Nationality | : **Indian** |

I, **S. Sam Selva Raj** hereby declare that the particulars given above are true to the best of my knowledge and belief.

**March 2025** **S. Sam Selva Raj.**

**"...जे मी तुला सांगितले आहे ते मी करीपर्यंत मी तुला सोडणार नाही".** (उत्पत्ती २८:१५).

उत्पत्ति २२ मध्ये, देवाने अब्राहामाला वचन दिले की, तो त्याची संतती ताऱ्यांसारखी बहुतपट वाढवील. तथापि, जेव्हा देवाने अब्राहमाला त्याचा वचनदत्त मुलगा इसहाक याला अर्पण करण्यास सांगितले, तेव्हा त्याच्या विश्वासाची परीक्षा घेण्यात आली. जसा अब्राहामाने



*देवाने अब्राहामाला अभिवचन दिले- तो त्याची संतती तार्यांसारखी बहुतपट वाढतील.*

आपला हात पुढे करून आपल्या मुलाचा वध करण्यासाठी सुरा घेतला, तेव्हा देवाने पर्यायी अर्पण म्हणून त्याला मेंढा दिला. ही गोष्ट आपल्याला हेच शिकवते की, विपरीत परिस्थितीमुळे आपल्याला कितीही अशक्य वाटत असले तरी, देव त्याची वचने टिकवून ठेवण्यास विश्वासयोग्य आहे.

आज त्याच्या अभिवचनांवर दावा करा!

## H→ २. पुनर्स्थापित केलेली आशा!

## 2. HOPE RESTORED!

येशू ख्रिस्ताचा संदेश हा आशेचा संदेश आहे; अगदी निराशाजनक परिस्थितीतही तो प्रत्येकासाठी आशा आहे. जगभरात अनेक लोक संघर्ष करीत आहेत, कारण त्यांनी त्यांच्या नातेसंबंधी, तसेच आर्थिक, भविष्य, नोकऱ्या आणि बऱ्याच गोष्टींसंबंधी आशा गमावलेली आहे, आणि महत्वाचे म्हणजे, स्वतःसंबंधी त्याने आशा गमावलेली आहे. आनंदाची बातमी ही आहे की, येशू ख्रिस्त निर्जीव परिस्थितीतही आशा पुनर्स्थापित करतो.

जसे निर्जीव बुडख्यामधून कोंब बाहेर येतो, तसे येशू ख्रिस्त निर्जीव परिस्थितीचे रूपांतर नवीन जीवनाच्या स्त्रोतांमध्ये करतो. येशूच्या जन्माच्या महत्त्वपूर्ण संदेशांपैकी एक संदेश आशा हा आहे. बुडखा जो निर्जीव व आशाहीन आहे त्याच्यातून एक कोंब निघेल- एक नवीन जीवन.

हा बुडखा एके काळी फुले, पाने, फांद्यांमध्ये घरटे बांधणारे पक्षी यांनी भरलेले आणि सावली आणि संरक्षण देणारे होते, पण आता ते तुटलेले, रिकामे झालेले, आणि निर्जीव अवस्थेत उभे आहे. ते उद्देष्यहीन असे निरुपयोगी आणि कुजण्यासाठी तसेच सोडून देण्यात आलेले दिसून येते. तरीही, या उजाड अवस्थेतूनही एक कोंब उदयास येतो- पुनरुज्जीवित झालेली एक नवीन शाखा.

भीषण दुष्काळात, सारफथ येथील विधवा स्वतःसाठी आणि तिच्या मुलासाठी



*सारफथ येथील विधवा काटक्या गोळा करीत होती!*

शेवटचे जेवण तयार करण्यासाठी काटक्या गोळा करीत होती. एलीयाच्या विनंतीनुसार, तिने त्याच्यासाठी भाकरी बनवण्याकरिता तिचे उरलेले शेवटचे पीठ आणि तेल वापरले. अद्भुतपूर्व, देवाने तिच्या घरासाठी पिठाचे मडके आणि तेलाची कुपी कधीही रिकामे होऊ दिले नाही.

ही गोष्ट (१ राजे १७ : ७--१६) देव अत्यंत निराशाजनक परिस्थितीतही आशा आणि उपजीविकेचे साधन कशाप्रकारे पुनर्स्थापित करतो हे स्पष्ट करते, अगदी निर्जीव बुडख्याच्या कोंबाप्रमाणे.

तुमची परिस्थिती कितीही निराशाजनक वाटत असली तरी येशूवर विश्वास ठेवा. तो वचनांचा स्रोत आहे आणि आशा पुनर्स्थापित करणारा आहे.

## देवाने केलेला जीर्णोद्धार आणि नवीन सुरुवात!

**देव आशेचा जीर्णोद्धार करतो:**

देव आपल्या जीवनात तेच करू शकतो जसे त्याने इतरांसाठी केले; आपल्या आनंदात रूपांतर करतो आणि आपल्या आशेचा जीर्णोद्धार करतो. ज्या विधवेने आपली समस्या देवाच्या चरणी आणली, त्याप्रमाणे आपणही आपला भार येशू ख्रिस्ताकडे आणला पाहिजे. जेव्हा आपण त्याच्यावर सर्व काही सोपवतो, तेव्हा तो आपल्या दुःखाचे आनंदात रूपांतर करतो आणि आपली आशा पुनर्स्थापित करतो. अगदी आपण आपली आशा गमावलेली आहे असे वाटत असतानाच येशू ख्रिस्ताच्या नावामध्ये ती पुनरुज्जीवित होऊ शकते.

## O→ ३. हानीवर मात करणारा!

## 3. OVERCOMER OF LOSS!

आपण परिस्थितीचे बळी पडून राहू नये म्हणून देव आपल्याला परिस्थितीवर मात करण्यासाठी पाचारण करतो. हे वर्ष तुमच्यासाठी कसे गेले किंवा कदाचित अजूनही तुम्ही भूतकाळातील ओझे वाहत असाल तर याची पर्वा न करता, हे लक्षात ठेवा: जे भग्न झालेले किंवा गमावलेले आहे त्याला येशू ख्रिस्त पुनर्स्थापित करतो. तो आपला पित्याबरोबर समेट घडवतो कारण तो जीर्णोद्धार करणारा आणि शांती प्रस्थापित करणारा देव आहे.

आज्ञा उल्लंघनाच्याद्वारे असो, पाप किंवा देवापासून दूर जाण्याद्वारे असो, काहीही असले तरी, तो त्या सर्वांचा जीर्णोद्धार करू शकतो. त्याच्या बलिदानाद्वारे जर त्याने पित्याबरोबर आपला समेट घडवून आणला आहे, तर तो आपल्या जीवनातील इतर घटकांचा आणखी कितीतरी अधिक प्रमाणात जीर्णोद्धार का नाही करणार? आपला देवाशी समेट व्हावा म्हणून येशू ख्रिस्त मरायला आला. त्याच्या वचनावर दावा करा व आपण जे काही गमावले आहे, तो त्याचा जीर्णोद्धार करील यावर विश्वास ठेवा.

(...पान ६ वर)

GREAT COMMISSION PARTNERS
ECHO OF HIS CALL MINISTRIES SINCE 1969

# महान सेवाकार्याचे भागीदार प्रार्थना विनंत्या

ओझी वाहाणे (गलती ६:२), गरजा भागविणे (रोम १२:१३), आणि कार्यास गती देणे (२ तिमथी १:६)

स्तुती आणि प्रार्थनेचे विषय - १९ मार्च, २०२५ पासून ते १८ एप्रिल, २०२५

**(कृपया हे पान बाजूला काढून, सतत प्रार्थना करण्याकरिता तुमच्या पवित्र शास्त्रात ठेवा)**

## ✝ याकरीता देवाची स्तुती करा...

**मार्च १९ -** प्रार्थनेतील आमच्या सहभागीदारांना, विश्वासातील सहभागीदारांना, जीवनभर सोबत असणाऱ्या सहभागीदारांना, सदस्यत्त्व घेणाऱ्या सहभागीदारांना, महान सेवाकार्याच्या सहभागीदारांना, आणि त्यांचे कुटुंबीय सदस्य या सर्वांना आशीर्वादित केल्याबद्दल देवाची स्तुती करा.

**मार्च २० -** दुर्गम भागात देवाच्या कार्यात गुंतलेले सेवक व त्यांच्या कुटुंबीयांकरिता देवाची स्तुती करा.

**मार्च २१ -** जगभरातील पवित्र शास्त्र आणि ख्रिस्ती साहित्य छापणाऱ्या सेवकांच्या गरजा पूर्ण करीत असल्याबद्दल देवाची स्तुती करा.

**मार्च २२ -** वैयक्तिक गरजा असतानाही आमच्या सेवाकार्याला आर्थिक मदत करणारे सहभागीदार आम्हाला प्रदान केल्याबद्दल देवाची स्तुती करा,

**मार्च २३ -** **एको ऑफ हिज कॉल**चे आमचे सहसंपादक आणि त्यांच्या कुटुंबीयांकरिता देवाची स्तुती करा.

**मार्च २४ -** आमचे ज्येष्ठ पाळक एस. सॅम सेल्वा राज आणि त्यांच्या कुटुंबाला दिलेल्या दैवी संरक्षण आणि उत्तम आरोग्याबद्दल देवाची स्तुती करा.

**मार्च २५ -** मिशनरींना आर्थिक, तसेच प्रार्थनेचे पाठबळ देण्यासाठी आम्हाला सक्षम केल्याबद्दल देवाची स्तुती करा.

**मार्च २६ -** आमच्या **सेंट पॉल मॅट्रिक्युलेशन स्कूल, नहेम्या बायबल कॉलेजेस** आणि **थिऑलॉजिकल कॉरस्पॉन्डस कोर्सेस**च्या सर्व उपक्रमांकरिता देवाची स्तुती करा.

**मार्च २७ -** ख्रिस्ती सिद्धांतांवर आधारित मिशनऱ्यांनी स्थापन केलेल्या शाळांद्वारे जगाला आशीर्वादित केल्याबद्दल देवाची स्तुती करा.

**मार्च २८ -** १९६९ पासून मासिक या माध्यमातून सेवाकार्य करण्यासाठी कटिबद्ध राहिलो म्हणून मिळालेल्या अद्भुत आशीर्वादांकरिता देवाची स्तुती करा.

**मार्च २९ -** **एको ऑफ हिज कॉल** युट्युब चॅनेलला जोडले जात असलेल्या नवनवीन सदस्यांबद्दल देवाची स्तुती करा.

**मार्च ३० -** **ग्लोबल व्हिजन फॉर युथ अँड किड केअर** सेवाकार्यासाठी आशीर्वादित केल्याबद्दल देवाची स्तुती करा.

**मार्च ३१ -** आमचे राज्य समन्वयक आणि त्यांच्या कुटुंबियांना आशीर्वादित केल्याबद्दल देवाची स्तुती करा.

**एप्रिल ०१ -** विशेषत: गोंधळाच्या आणि युद्धाच्या दहशती दरम्यान शांतता आणि स्थिरतेसाठी केलेल्या प्रार्थनांमुळे समस्त देशांवरील दैवी सुरक्षिततेबद्दल देवाची स्तुती करा.

**एप्रिल ०२ -** राजकीय आणि धार्मिक विरोध असतानाही ख्रिस्ती सेवकांची जोमाने वाढ केल्याबद्दल देवाची स्तुती करा.

**एप्रिल ०३ -** विविध सेवांद्वारे सुवार्तेचा प्रसार करण्यासाठी आमच्या ज्येष्ठ पाळकांनी केलेल्या समर्पणाबद्दल देवाची स्तुती करा.

## ✝ कृपया यासाठी प्रार्थना करा...

**एप्रिल ०४ -** आमचे **सेंट पॉल मॅट्रिक्युलेशन स्कूल**चे १० वीचे विद्यार्थी जे बोर्डाची परीक्षा देत आहेत त्यांच्यासाठी प्रार्थना करा.

**एप्रिल ०५ -** शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी आमच्या निवासी आणि संध्याकाळच्या **नहेम्या बायबल कॉलेज**मध्ये पात्र विद्यार्थ्यांनी प्रवेश घ्यावा यासाठी प्रार्थना करा.

**एप्रिल ०६ -** आमचे ज्येष्ठ पाळक, एस. सॅम सेल्वा राज यांना त्यांच्या विविध सेवाकार्यांसाठी नवनवीन दर्शन प्राप्त व्हावे यासाठी प्रार्थना करा.

**एप्रिल ०७ -** अंमली पदार्थांच्या व्यसनापासून मुलांचे आणि तरुणांचे संरक्षण व्हावे यासाठी प्रार्थना करा.

**एप्रिल ०८ -** जगभरातील वाढत्या वाईट सवयींपासून मुलांचे आणि तरुणांचे संरक्षण व्हावे यासाठी प्रार्थना करा.

**एप्रिल ०९ -** २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी आमच्या **सेंट पॉल मॅट्रिक्युलेशन स्कूल**मध्ये नवीन विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी प्रार्थना करा.

**एप्रिल १० -** जगभरातील बाल तस्करीचे निर्मूलन व्हावे यासाठी प्रार्थना करा.

**एप्रिल ११-** जगभरातील मंडळ्यांमध्ये संजीवनीचे कार्य व्हावे यासाठी प्रार्थना करा.

**एप्रिल १२ -** सर्व देशांचे राष्ट्रपती, पंतप्रधान, मुख्यमंत्री आणि संसद सदस्य यांच्यासाठी प्रार्थना करा.

**एप्रिल १३ -** जगातील तरुण मुलामुलींनी येशू ख्रिस्ताला त्यांचा वैयक्तिक तारणहार म्हणून स्वीकारावे यासाठी प्रार्थना करा.

**एप्रिल १४ -** जगभरातील सर्व लोकांच्या गरजा पूर्ण व्हाव्या यासाठी प्रार्थना करा.

**एप्रिल १५ -** सर्व देशांनी सर्व घटकांमध्ये आणि योजनांमध्ये ऐक्य, प्रगती आणि शांतता अनुभवावी यासाठी प्रार्थना करा.

**एप्रिल १६ -** आमचे समर्थक, हितचिंतक आणि मित्र जे आमच्या सेवाकार्यांना प्रार्थना आणि आर्थिक मदतीद्वारे उचलून धरतात ते सुद्धा आशीर्वादित आणि बळकट व्हावे यासाठी प्रार्थना करा.

**एप्रिल १७ -** आमच्या मुख्य आणि इतर मंडळ्यांमध्ये होणाऱ्या उत्तम शुक्रवार आणि इस्टरच्या उपासनेसाठी प्रार्थना करा.

**एप्रिल १८ -** जागतिक आर्थिक मंदी संपुष्टात यावी, जेणेकरून प्रभावित झालेल्यांना दिलासा मिळावा यासाठी प्रार्थना करा.

(पान ४ वरुन)



*देवाने पुनश्च ईयोबाचा जीर्णोद्धार केला!*

जर देव मृत, निर्जीव बुडख्याला जिवंत करू शकतो, तर तो तुमच्यासाठी आणि माझ्यासाठी किती अधिक प्रमाणात का करू शकणार नाही?

ईयोब ४२ मधील ईयोबाच्या कथेचा विचार करा: त्याने सर्व काही गमावले – त्याची मुले, संपत्ती आणि आरोग्य सुद्धा. तरीही, तीव्र दुःख सहन करूनही ईयोब विश्वासू राहिला. सरतेशेवटी, देवाने



*दावीदाने सर्व काही परत मिळवले.*

त्याचा पुनश्च्च जीर्णोद्धार केला आणि त्याला पूर्वीपेक्षा दुप्पट दिले. यावरून हे प्रदर्शित होते की, देव हा जीर्णोद्धार किंवा पुनर्स्थापित करणारा देव आहे; अकल्पनीय नुकसानानंतरही तो विपुलतेने आशीर्वादित करतो.

त्याचप्रमाणे, १ शमुवेल ३० मध्ये, दावीदाने अमालेक्यांकडून सर्वकाही गमावले. निराश होण्याऐवजी, त्याने प्रभूमध्ये सामर्थ्य शोधले आणि सर्वकाही पुनर्प्राप्त केले. तुम्ही जे काही गमावले आहे ते सर्व प्रभु तुम्हाला सुद्धा परत मिळवून देवो.

## ४. नवीन सुरुवात करून देणारा!

## 4. OPENER OF NEW BEGINNINGS!



पवित्र शास्त्र आपल्याला खात्री देते की, देवाची आपल्या प्रत्येकासाठी एक योजना आहे – एक योजना जी आपल्याला आशा आणि भविष्य देते. आपण त्याच्या हाताच्या तळव्यावर कोरलेले आहोत. तथापि, आयुष्य कधीकधी अनपेक्षित वळण घेऊन आपण वाटेतच हरवले जाऊ शकतो.

येशू ख्रिस्ताचा चांगुलपणा हाच आहे की, तो दुसरी संधी देतो. आपण जरी चुका करतो, तरीही निर्माण झालेल्या परिणामांतून तो काहीतरी सुंदर बनवतो. रोम ८:२८ मध्ये सांगितल्याप्रमाणे, "…..**देवावर प्रीती करणारे,…… त्यांच्या हितासाठी सर्व गोष्टी मिळून कार्य करणाऱ्या होतात**".

तो नवीन दरवाजे उघडणारा आणि नवीन सुरुवात करून देणारा देव आहे. मी प्रार्थना करतो की, आपण हे वाचत असताना, तुमच्यासाठी नवीन संधी निर्माण होतील आणि तुमच्या आयुष्याची नवीन सुरुवात होईल. येशू ख्रिस्त आपल्याला विपुलतेने उद्देश आणि जीवन देण्यासाठी आला होता. प्रार्थनेने तुमचे जीवन त्याला समर्पित करा, आणि तो सर्व गोष्टी नवीन करील.

जेथे काहीही नव्हते तेथे देवाने जीवन अस्तित्त्वात आणले, जसे निराशावस्थेतून नव्या सुरुवातीमध्ये परिवर्तन. एकेकाळी निर्जीव असणाऱ्या बुडख्यातून एक नवीन कोंब येईल, जे नवीन जीवनाचे प्रतीक आहे. निर्जीवपणातून जीवन निर्माण करण्याची शक्ती देवामध्ये आहे. यहेज्केल अध्याय ३७ आपल्याला सुकलेल्या हाडांशी बोलण्याची आठवण करून देतो; ही हाडे पुन्हा सजीव होतील. प्रत्येक मृत परिस्थितीशी जीवनाच्या गोष्टी बोला, कारण ते येशू ख्रिस्ताच्या जन्माचे अभिवचन आहे.

यहेज्केलने सुकलेल्या हाडांनी भरलेल्या खोऱ्याचा दृष्टान्त पाहिला. जेव्हा देवाने



*यहेज्केलने सुकलेल्या हाडांनी भरलेल्या खोऱ्याचा दृष्टांत पाहिला.*

(…पान ९ वर)

नहेम्या बायबल कॉलेजेस
चेपॉक आणि संतोषपुरम, वेलाचेरी, चेन्नाई
शैक्षणिक पात्रता : १० वी इयत्ता आणि अधिक
प्रवेशा करिता त्वरा करा ! माध्यम : तमिळ (अर्धवेळ)
हिंदी (निवासी) (स्पोन्सरशिप उपलब्ध)
ईश्वरविद्या डिप्लोमा
संपर्क : अध्यक्ष : नहेम्या बाईबल कॉलेज
10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA.
Phone : (+91-44) 2852 8282, Cell : (+91) 98410 71852 / 95661 31858
E.mail : sam@echoofhiscall.org / Website : www.echoofhiscall.org
आंतरराष्ट्रिय ख्रिस्ती पुढाऱ्यांद्वारे आणि वरिष्ट पाळकांद्वारे ५५ वर्षांपासून मान्यता प्राप्त
* ऑनलाईन क्लास उपलब्ध आहे *

## -: आमच्या मुख्यालयातील सेवाकार्या :-

| | | |
|---|---|---|
| १. | प्रार्थना सेवा | : २४ तास |
| २. | **एको ऑफ हिज कॉल** | : मासिक : इंग्रजी, तामिळ, मल्यालम, तेलगु, हिन्दी, कन्नड, मराठी, गुजराथी, बंगाली, ओरिया, नेपाळी, आसामी, पंजाबी, उर्दु, सिंहली आणि आफ्रिकन |
| ३. | **बायबलकोर** | : मुळभूत बायबल अभ्यासक्रम (इंग्रजी, तामिळ आणि हिन्दी) |
| ४. | पत्रव्यवहाराद्वारे थियॉलॉजीकल अभ्यासक्रम : इंग्रजी आणि तामिळ | |
| ५. | नहेम्या बायबल कॉलेज | : (चेपॉक, संतोषपुरम आणि वेलाचेरी) |
| ६. | महान आज्ञापालनाचे भागीदार : | (पाळकांचे नेटवर्क) |
| ७. | प्रशिक्षण कार्यक्रम | : सेमिनार आणि रीट्रीटो |
| ८. | महासभा | |
| ९. | छापील साहित्य वाटप आणि पाठ पुरावा | |
| १०. | शुभवर्तमान साहित्य मुद्रणालय | : प्रकाशने |
| ११. | सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कुल | : गावातील इंग्रजी माध्यम हायस्कूल |
| १२. | रवीवारी शब्बाथ शाळा (चेपॉक, वेलाचेरी, बालाजी नगर आणि संतोषपुरम) | : सकाळी १०.३० आणि सायंकाळी३ वाजता-रविवारी |
| **१३.** | **सकाळची उपासना** | **: रविवारी सकाळी ५.३० वाजता** |
| **१४.** | **सुरुवातीची उपासना** | **: रविवारी सकाळी ८.०० वाजता** |
| **१५.** | **तामिळ उपासना** | **: रविवारी सकाळी ८.३० वाजता** |
| **१६.** | **युवा सभा** | **: रविवारी दुपारी ११.०० वाजता** |
| **१७.** | **सहभाग भोजन** | **: रविवारी दुपारी १.०० वाजता** |
| **१८.** | **हिन्दी उपासना** | **: सायंकाळी ४ वाजता - रविवारी** |
| **१९.** | **तेलगु उपासना** | **: सायंकाळी ५ वाजता - रविवारी** |
| **२०.** | **इंग्रजी आणि हिंदी उपासना** | **: सायंकाळी ६ वाजता - रविवारी** |
| २१. | अभिप्रायाची वेळ | : सायंकाळी ७.३० वाजता - रविवारी |
| २२. | स्त्रियांची प्रार्थना | : सायंकाळी ५.३० वाजता - बुधवारी |
| २३. | पुरुषांची प्रार्थना | : सायंकाळी ७ वाजता - शुक्रवारी |
| २४. | शिष्यत्त्वाची सभा | : सायंकाळी ६ वाजता - शनिवारी |
| २५. | गृह प्रार्थना सभा | : सायंकाळी ६.३० वाजता - मंगळवारी/गुरुवारी |
| २६. | विशेष प्रभु भोजन | : पहाटे ६ वाजता प्रत्येक महिन्याच्या १ल्या दिवशी |
| २७. | सेवाकाची समालोचन सभा | : सायंकाळी ५.३० वाजता - पहिला शनिवार६ |
| २८. | पालकांची प्रार्थना | : सायंकाळी ४ वाजता - पहिला रविवार |
| २९. | रात्रभर प्रार्थना | : सकाळी ९.३० वाजता - तिसऱ्या शुक्रवार |
| ३०. | उपास प्रार्थना | : सकाळी ९.३० वाजता - दुसऱ्या शनिवार |
| ३१. | पवित्र सहभागिता | : दुसऱ्या रविवारच्या उपासनेत |
| ३२. | तरुण/तरुणी/लहान लेकरांसाठी प्रार्थना : दररोज रात्रो १० वाजता (फोन द्वारा) | |
| ३३. | कार्यालयीन स्टाफचे मनन | : सकाळी ९ वाजता - दररोज |
| ३४. | कार्यालय | : सकाळी ९ ते रात्री ९ पर्यंत (रविवार वगळून) |

## एको ऑफ हिज कॉल टपाल द्वारे अभ्यासक्रम

**केवळ भारतातील उमेदवारां करीता**

### १) बायबलकोर

आम्ही नवीन ख्रिस्ती विश्वासणारे आणि अन्य विश्वासातील लोकांकरिता टपालाद्वारे बायबल मधील पायाभूत सत्यांवर इंग्रजीत ५७ पाने, हिन्दी ७६ पाने आणि तामीळमध्ये ९६ पानांचा अभ्यासक्रम देऊ करीत आहोत. तुम्हाला **'न्यु लाईफ फॉर यू'** या शिर्षकाचे अभ्यासक्रमाचे पुस्तक देण्यात येईल! **अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर, तुम्हाला प्रमाणपत्र दिले जाईल. अभ्यासक्रमाकरिता आवश्यक अशी फी आकारली जाणार नाही. तुम्ही आशीर्वादित व्हाल!**

### २) टपालाद्वारे ईश्वर विज्ञान आभ्यासक्रम

हा अभ्यासक्रम सुर्वानिक, ख्रिस्ती पुढारी आणि अरिक्षित सभासद ज्यांना देवाची सेवा करण्याची तीव्र इच्छा आहे, अशा करिता इंग्रजीत ५३७ पानांचा आणि तामिळ भाषेत ६५२ पानांचा अभ्यासक्रम उपलब्ध आहे. अभ्यासक्रमाची १००० रुपये फी आकारली जाते. त्यामध्ये १४९ अध्याय/पाठ समाविष्ट असलेली एकूण ७ पुस्तके देण्यात येतील. **'सर्टफिकेट इन मिनिस्ट्री'** प्रमाणपत्र देण्यात येईल. देव तुम्हाला आशीर्वाद देईल!

***अधीक माहिती करिता आम्हाला लिहा -***

**अध्यक्ष - नहेम्या बाईबल कॉलेज**

**एको ऑफ हिज कॉल,** पोस्ट बॉक्स नं. २९५७,
चिपॉक, चैन्नई - ६०० ००५
फोन : (०४४) २८५२ ८२८२, २८५२ ९२९३,
फोन : ९८४१० ७१८५२, ९५६६१ ३१८५८
E-mail: biblecor@yahoo.co.in

## एको ऑफ हिज कॉल

**मासिक (विनामुल्य) मिळविण्याची उत्तम संधी**

तुम्ही तुमच्या मित्रांचे/नातेवाईकांचे पत्ते आमच्याकडे पोस्टाद्वारे, पत्राद्वारे, ई.मेल, वॉटस् ॲप किंवा फोन द्वारे पाठविल्यास, आम्ही त्यांना त्यांच्या पत्त्यावर मासिक विनामुल्य पाठवित जाऊ.

## कर सवलत

**एको ऑफ हिज कॉल एज्युकेशनल ट्रस्ट**ला भारतातील कोणत्याहि एका व्यक्तिद्वारे किंवा संस्थाद्वारे देण्यात येणारी देणगी हि आयकर कायद्याच्या ८० जी कलमा अंतर्गत कर सवलतीस पात्र ठरते. कृपया आपली देणगी डी.डी./धनादेश/मनी आर्डर "**एको ऑफ हिज कॉल एज्युकेशनल ट्रस्ट**" च्या नावाने खालील तपशीलानुसार आम्हाला पाठवा

| | |
|---|---|
| **Account Name** | **: ECHO OF HIS CALL EDUCATIONAL TRUST** |
| **Account Number** | **: 1023 2923 805** |
| **Bank Name** | **: STATE BANK OF INDIA** |
| **Branch** | **: TRIPLICANE, CHENNAI - 600 005** |
| **IFSC Code** | **: SBIN 0000249** |
| **SWIFT Code** | **: SBI NIN BB 455** |



# खड्ड्यातून महालापर्यंत

## PIT TO PALACE

**''नाचणाऱ्याने हे ध्यानात आणावे !'' (मत्तय २४:१५)**

**(पास्टर एस. सॅम सेलवाराज यांच्या जीवनातील अनुभव)**

**''जो यहोवाच्या ठायी भरवसा ठेवतो तो सुखी आहे'' – नीतिसूत्रे १६:२०.**

माझ्या सेवाकार्याच्या सुरुवातीच्या वर्षानंतर, परदेशातील ख्रिस्ती सेवक कसे राहतात, त्यांनी त्यांच्या आध्यात्मिक जीवनाचे पालनपोषण कसे केले आणि त्या राष्ट्रांमध्ये सेवाकार्ये कशी चालवली जातात याबद्दल माझ्या मनात खोल कुतूहल निर्माण झाले. तथापि, त्या वेळी माझ्याकडे आर्थिक संसाधने, सार्वजनिक पाठबळ आणि पुरेशा आत्मिक वरदानांची कमतरता होती.

मला स्वतःला आश्चर्य करणारी एक गोष्ट म्हणजे, १९८९ च्या ऑगस्टमध्ये मी मलेशियाला भेट देणार आहे हे त्याच वर्षी माझ्या डायरीत लिहिण्याचे मला धाडस झाले. लवकरच त्याबद्दल मी विसरून गेलो आणि जवळजवळ तीन महिने ह्या विचाराने मी अनभिज्ञ होतो. एके दिवशी, मला माझी डायरी हाताला लागली आणि मी जे ठरवले होते त्याची आठवण झाली. माझ्या भेटीची प्रस्तावित तारीख वेगाने जवळ येत आहे हे लक्षात येताच, मी प्रभूच्या वचनावर विश्वास ठेवून प्रार्थनेत हा विषय त्याच्यासमोर आणला : ''**कशाचीही चिंता करू नका; तर सर्व गोष्टींविषयी उपकार स्तुतीसहित प्रार्थना व विनंती करून आपली मागणी देवाला कळवा.**'' - फिलिप्पै ४:६.

दिवस आठवड्यांमध्ये बदलू लागले, तरीही काहीही होताना दिसत नव्हते. परदेशात जाण्यासाठी माझ्याकडे कोणतेही साधन नाही हे माझ्या मनाला माहित होते, परंतु माझा देवावरील विश्वास अढळ होता. या काळात ख्रिस्तामधील मला एक भाऊ भेटला, जो सेवेसाठी वारंवार मलेशियाला जात असे. मी माझी इच्छा त्याला सांगितली आणि त्याने मला पुढील मार्गदर्शनासाठी चेन्नई येथे त्याच्या घरी येऊन भेटण्यास प्रोत्साहित केले.

दुसऱ्या दिवशी सकाळी मी त्याच्या घरी गेलो. दुर्दैवाने, तो व्यस्त असल्यामुळे दुसऱ्या दिवशी पुन्हा येण्यास त्याने मला सुचवले. हे असंच एका महिन्यापेक्षा जास्त काळ चालू राहिले. प्रत्येक भेटीत मला वेळ आणि पैसा दोन्ही खर्च करावा लागला, फक्त मला हे लक्षात आले की, तो मदत करण्यास तयार नाही. शेवटी, तो मला स्पष्टपणे म्हणाला, तू मलेशियाला जाऊ शकत नाहीस. माझ्यासारखे वरदान मिळालेले आणि सक्षम असणारे लोकच तिथे सेवा करू शकतात. मलेशियातील कोणीही तुला स्वीकारणार नाही. यापुढे माझ्याकडे येऊ नकोस.

त्याने केलेल्या निराशेनंतरही मी आशा सोडली नाही. देवाची इच्छा प्रकट होण्याची धीराने वाट पाहत मी प्रार्थना करीत राहिलो.

दोन आठवड्यांनंतर, मी माझ्या कार्यालयामध्ये पत्रांची क्रमवारपणे विभागणी करीत असतांना मला मलेशियाचे एक पत्र सापडले. तिथे सेवा करीत असलेले पास्टर देवराजुलू यांचे ते पत्र होते. त्यांचे शब्द पुढीलप्रमाणे होते :

***ख्रिस्तातील माझा प्रिय भाऊ, ब्र.सॅम सेल्वा राज,***

***मी पुस्तकांचा प्रेमी आहे. आज मी जुन्या पुस्तकांची विक्री करणाऱ्या दुकानाला भेट दिली आणि तिथे मला तुमच्या एको ऑफ हिज कॉल मासिकाची जुनी आणि जीर्ण झालेली प्रत मिळाली. मी ती वाचत असताना, देव माझ्याशी बोलला. कृपया मला तुमच्या आधीच्या प्रति सुद्धा पाठवा; टपालाचा खर्च मी करीन. मला तुम्हाला व्यक्तिशः भेटायला आवडेल. मी तुमच्या प्रवासाचा, भोजनाचा आणि राहण्याचा खर्च करण्यास तयार आहे. कृपया मलेशियाला या. शिवाय, सिंगापूर आणि इंडोनेशियामध्ये तुमच्या सेवेची मी व्यवस्था करीन. तुमच्यासारख्या देवाच्या सेवकांची आम्हाला गरज आहे. कृपया त्वरित उत्तर पाठवा.***

***सप्रेम, पास्टर देवराजुलू.***

देवाच्या विश्वासूपणामुळे मी भारावून गेलो. माझ्या डायरीत लिहिल्याप्रमाणे, ऑगस्ट १९८९ मध्ये पास्टर देवराजुलु यांचे निमंत्रण मिळाल्याने मी मलेशियाला भेट देऊ शकलो. मी सिंगापूर आणि इंडोनेशियालाही गेलो, जिथे मी शेकडो लोकांना उपदेश केला; प्रभु येशू ख्रिस्ताद्वारे पाप, शाप आणि गरिबीपासून मुक्तीचा संदेश सामायिक केला. देवाने मला तिथे केवळ सेवा करण्याची संधी दिली नाही, तर त्या देशांमध्ये देवाच्या अनेक सेवकांशी चिरस्थायी मैत्री करण्यास उत्तेजित केले, जी आजपर्यंत टिकून आहे.

तेव्हापासून, प्रभूने माझ्या सेवेचा विस्तार केला, व मला दक्षिण आफ्रिका, अमेरिका, इंग्लंड, स्कॉटलंड, फ्रान्स, जर्मनी, स्वित्झर्लंड, कॅनडा, ऑस्ट्रेलिया आणि श्रीलंका यांसारख्या राष्ट्रांमध्ये त्याच्या वचनाचा प्रचार करण्यास सक्षम केले. येशू ख्रिस्ताकडून मिळणाऱ्या तारणाचा संदेश हजारो लोकांनी ऐकलेला आहे. आज, मला निरनिराळ्या देशांतून सेवाकार्याची असंख्य आमंत्रणे येतात, पण ती सर्व स्वीकारण्यासाठी माझ्याकडे वेळ नाही. माझ्या आयुष्यात देवाच्या आशीर्वादाची इतकी व्याप्ती आहे.

प्रिय वाचकांनो, मी ज्याची सेवा करतो तो प्रभु येशू ख्रिस्त हा एकच खरा देव आहे. तोच मार्ग, सत्य, आणि जीवन आहे. त्याच्यावर विश्वास ठेवा. त्याला तुमचे जीवन समर्पित करा. त्याची सेवा करण्यास जर तुम्हाला पाचारण करण्यात आलेले आहे असे वाटते, तर विश्वासाने निर्णय घ्या. तो तुम्हाला अद्भुतरित्या मार्गदर्शन करील आणि तुम्हाला भरपूर आशीर्वाद देईल.

''**त्याने खडक पालटून पाण्याचे तळे केले, गारेचा खडक पालटून पाण्याचा झरा केला.**'' (स्तोत्र ११४:८).

(पान ६ वरुन)

त्याला भविष्यवाणी करण्याची आज्ञा दिली तेव्हा ती हाडे एकत्र आली, ती मांसाने झाकून गेली, त्याच्यामध्ये श्वास घातला गेला, आणि त्यातून एक विशाल सैन्याची निर्मिती झाली. पुनरुत्थानाचे आणि नवीकरणाचे हे अद्भुत चित्र आपल्याला खात्री देते की, देव अगदी ओसाड आणि निर्जीव परिस्थितीतही नवीन सुरुवात करू शकतो.

बुडख्यापासून निघालेला एक कोंब! अस्तित्त्वात नसलेल्या गोष्टींना तो अस्तित्त्वात आणतो. रोम ४:१७ हे वचन जाहीर करते की, "**.....जो देव मेलेल्यांना जिवंत करतो, आणि नसलेल्या गोष्टी असल्यासारख्या बोलावतो**".....

**आपला देव आपण ज्याची मागणी किंवा कल्पना करतो त्यापेक्षा फार अधिक आपल्याला देतो.** (इफिस ३:२०).

आशा सोडू नका! एक नवीन सुरुवात तुमची वाट पाहत आहे. तुम्ही जर विश्वास ठेवाल तर तुम्ही देवाचे गौरव पाहाल. त्याच्यावर विश्वास ठेवा, कारण देवाला कोणतीही मर्यादा नाही. आपण तोंड देत असलेल्या समस्या सोडवण्यास आपल्याला जरी अशक्य वाटत असेल, तरी तो अशक्याला शक्य करण्यास समर्थ आहे.

## T ➔ ५. खरा द्राक्षवेल!

## 5. THE TRUE VINE!

येशू ख्रिस्त, जो खरा द्राक्षांचा वेल, तो आपल्याला विपुलतेने जगण्यास आणि देवाच्या गौरवासाठी फळ देण्यास सक्षम करतो. फलदायी होण्यासाठी आपण त्याच्यावर अवलंबून असले पाहिजे. येशू



*जे त्याच्यामध्ये राहतात ते पुष्कळ फळ देतात, ज्याद्वारे पित्याचे गौरव होते.*

ख्रिस्त जगात आला, जेणेकरून आपण देवाची मुले होऊन त्याच्या राज्यासाठी फळ देऊ शकतो. **त्याच्याशिवाय आपण काहीही करू शकत नाही** (योहान १५:५).

फाटा हा फलदायीपणा, वाढ आणि विपुलतेचे प्रतीक आहे. येशू ख्रिस्ताचे शिष्य म्हणून आपल्याला फळ देण्यास पाचारण केलेले आहे, जेणेकरून स्वर्गातील पित्याचे गौरव व्हावे. येशू हा खरा द्राक्षवेल आहे आणि त्याचे शिष्य हे फाटे आहेत असे त्याने त्यांना शिकवले. त्याने त्यांना त्याच्यामध्ये राहण्यासाठी प्रोत्साहित केले, कारण त्याच्याशिवाय ते काहीही करू शकत नव्हते. जे त्याच्यामध्ये राहतात ते पुष्कळ फळ देतात, ज्याद्वारे पित्याचे गौरव होते (योहान १५).

येशू ख्रिस्त, जो खरा द्राक्षवेल, याच्यावर अवलंबून राहण्याने होणारी वाढ आणि फलदायीपणा या विचाराला हे सत्य थेट प्रतिबिंबित करते.

माझी प्रार्थना आहे की, तुम्ही यशया ११:१ या वचनावर मनन करीत असता, देव तुमच्या आयुष्यात, तुमच्या कुटुंबात, तुमच्या सेवेत आणि तुमच्या कामाच्या ठिकाणी एक नवीन कोंब निर्माण करील. हा छोटा पण महत्त्वपूर्ण कोंब एक परिवर्तन आणि नवे रूपांतर घडवून आणील.

या वर्षी, तुमच्या जीवनात ह्या नवीन सुरुवातीने मूळ धरण्यास आरंभ करावा अशी मी प्रार्थना करते. सर्व आशेचा स्त्रोत, जो आपली प्रत्येक हानी भरून काढतो आणि राखेतून सौंदर्याची निर्मिती करतो, त्याच्यावर तुम्ही विश्वास ठेवावा. तो पुनर्स्थापना करणारा देव आहे, जो नव्या आरंभासाठी दारे उघडतो!

मी प्रार्थना करते की, हे वर्ष तुमच्या जीवनातील प्रत्येक क्षेत्रात नवीकरणाचे आणि फलदायी असे वर्ष असेल. तुम्ही त्याच्यामध्ये राहत असताना, तुम्ही बहुगणित, भरभराट आणि विपुलता अनुभवू शकता. त्याच्यावर विश्वास ठेवा म्हणजे तुम्ही पुष्कळ फळ द्याल, ज्यामुळे पित्याचे गौरव होईल.

************

## तातडीची गरज

**एको ऑफ हिज कॉलची जलदगतीने वाढ होत आहे. आम्हाला मिशन विचारसरणी असलेले; समर्पित आणि विश्वासू पुरुष आणि स्त्री उमेदवार खालील पदांकरीता हवे आहेत.**

- मुख्य मंडळी करिता पूर्ववेळ सहकारी पाळक
- चैन्नाईमधील शाखा मंडळ्यांकरिता पूर्ववेळ सहकारी पाळक
- पूर्णवेळ सुरक्षा रक्षक
- डी.टी.पी. चालक आणि टंकलेखक
- इंग्रजी आणि इतर भाषा बोलू आणि लिखाण करु शकणारे व्यावसाईक
- व्यवस्थापनात इच्छुक असलेले कार्यालय मॅनेजर
- पूर्ववेळ बायबल कॉलेजकरिता व्याख्याते
- आमचे सेवाकार्याची ओळख करुन देणारे स्वयंसेवक
- पूर्ववेळ वाहन चालक
- मॅट्रीक्युलेशन शाळेकरिता प्रिन्सीपल आणि शिक्षक
- पूर्ववेळ स्वयंपाकी (स्त्री उमेदवार)
- पूर्ववेळ स्वच्छता पाहणारे कर्मचारी वर्ग

**वेतन :- अनुभव आणि पात्रतेवर आधारीत**

**एको ऑफ हिज कॉलला अर्ज करा**
**वॉटसअप नंबर : 98412 71858**
**ईमेल : sam@echoofhiscall.org**

RNI NO. 70106/98, Postal Regn. No. TN/CH/(C)/206/24-26 WPP NO. TN/PMG(CCR)/WPP-261/24-26

## Echo of His Call

**YouTube**
Please subscribe

Kindly view and subscribe our **Echo of His Call YouTube Channel** when you get time. Thanks.
**- Editor**

### OUR BANK DETAILS:

***1. Bank : State Bank of India***

Branch : **Triplicane, Chennai-5**
Name : **S. Sam Selva Raj**
A/C No. : **1023 2934 679**
IFSC : **SBIN 00 00 249**
SWIFT CODE : **SBI NIN BB 455**

***2. Bank : ICICI Bank***

Branch : **Anna Salai, Chennai-6**
Name : **Echo of His Call**
A/C No. : **6038 0502 2319**
IFSC : **ICIC 000 6038**

***3. Bank : State Bank of India***
**(This Account is for Tax Exemption for Indians only )**

Branch : **Triplicane, Chennai-5**
Name : **Echo of His Call Educational Trust**
A/C No. : **1023 2923 805**
IFSC : **SBIN 00 00 249**

**Google Pay: 98410 71858**
**PayPal : SAM SELVA RAJ**
*****
**E.mail : sam@echoofhiscall.org**

# ECHO OF HIS CALL

१७ भाषेत मासिक, बायबल कॉलेज पत्रव्यवहाराद्वारे अभ्यासक्रम मंडळी रोपन कार्य. गावात इंग्रजी माध्यम शाळा, शुभवर्तमान साहित्य मुद्रणालय, महासभा, शिबीर, सामाजिक सेवा इत्यादि.

**वार्षिक वर्गणी : रूपये १००/-     आजीवन वर्गणी : रूपये २०००/-**

एको ऑफ हिज कॉल मिनिस्ट्रीजची विविध सेवा कार्ये तुमच्यासारख्या स्वेच्छा दान आणि देणग्या देणाऱ्या देवाच्या लेकरांनी दिलेल्या आधाराद्वारे करण्यात येतात. या सेवाकार्याकरिता देव तुम्हाला सुचवेल तशा प्रकारे तुम्ही आधार देवू शकता. शुभवर्तमान न पोहंचलेल्या लोकांपर्यंत ते नेण्याकरिता व मंडळ्या रोपन कार्याकरिता आम्हांला तुमच्या मदतीची गरज आहे.

एको ऑफ हिज कॉल मासिक तुम्हांला नित्य नियमाने मिळावे अशी तुमची इच्छा असेल तर कृपया आम्हाला लिहून कळवा. तुमचा पोस्टाचा किंवा ई-मेलचा पत्ता बदलला असेल तर कृपया जुना व नवा पत्ता आम्हांला कळवा.

आमच्या वेब साईटवर देखील १७ भाषेतील मासिक उपलब्ध आहे. तुम्ही साईट वर जाऊन ते वाचू सकता व डाऊन लोड देखील करून आशीर्वादित होऊ शकता.

Your letters, prayer requests and your financial helps **(Money Orders, Cheques or Demand Drafts, NEFT, PayPal (Sam Selva Raj, sam@echoofhiscall.org) PhonePe (98410 71858), Gpay (98410 71858), Western Union, MoneyGram, etc.)** to **ECHO OF HIS CALL** may please be sent to the address below.

आम्हांला आमची यादि अद्यावत करण्याकरिता कृपया तुमचा घरचा फोन मोबाईल फोन क्रमांक आणि ई.मेल कळवा.

Our address :

**ECHO OF HIS CALL**
10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA
PH: (+91-44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766/ Cell: (+91) 98410 71852, 95661 31858 / E.mails: sam@echoofhiscall.org / biblecor@yahoo.co.in
Websites: www.echoofhiscall.org / www.stpaulsmatriculation.com

**YOU CAN SEND YOUR DONATIONS BY ONLINE ALSO**

**RNI NO. 70106/98**
**Postal Regn. No. :TN/CH/(C)/206/24-26**
**WPP NO. TN/PMG(CCR)/ WPP- 261/24-26**
**Date of Publication: Second week of every month**
**Date of Posting : 11th & 12th of every month**
**Posted at "Egmore RMS / 1 Patrika Channel"**
**on 12th MARCH 2025.**
**If un-delivered please return to:**
**ECHO OF HIS CALL (MARATHI)**
**P.O. Box No. 2957,**
**Chepauk, Chennai - 600 005, INDIA.**
**Phone: (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766**

***JESUS LOVES YOU!***

**To**

*GOD BLESS YOU!*

Owned and published by **S. Sam Selva Raj** from New No. 8 & 10, Old No.18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005 and printed by **S. Sam Selva Raj at Echo of His Call Printers**, New No. 8 & 10, Old No.18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005. Editor: **S. Sam Selva Raj.**